महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.मासं/रवका/न.क्र.५६९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट नं.जी-९,
प्रो.अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व),
मुंबई - ४०० ०५१.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २६४७५९९५
फॅक्स क्रमांक : ०२२ - २६५८०६४२

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४२२ दिनांक १९ /०७ / २०१२

विषय : म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी २०१२ ते दि.३१ मार्च २०१२ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत.

वाचा : सा.आ.क्र.११७ (क) दिनांक ३१.३.१९८६

......

महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग **क्र.मभवा-१११२/प्र.क्र.१५/सेवा-९ दिनांक ०९.०४.२०१२** अनुसार वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ६५ % या दराने महागाई भत्ता म.रा.वि.वितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय परिपत्रक क्र. ४०५ दि.१२.०४.२०१२ अनुसार दि.०१.०४.२०१२ पासून लागू करण्यात आला आहे.

२. आता राज्य शासनाच्या वित्त विभागाने शासन निर्णय क्र.**मभवा-१११२/प्र.क्र.१५/सेवा-९ दि.१०.०७.२०१२** अन्वये राज्य शासकीय व इतर कर्मचारी तसेच ज्यांना महागाई भत्ता अनुज्ञेय आहे अशा सर्व पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी २०१२ ते दि.३१ मार्च २०१२ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्यात यावी असे आदेश दिले आहेत.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी २०१२ ते दि.३१ मार्च २०१२ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजुरी दिली आहे.

४. परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहे जानेवारी २०१२ ते मार्च २०१२ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे **जुलै २०१२** च्या वेतनामध्ये समाविष्ट करुन देण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

१९/७/१२

*( संदेश ए.हाके )*
***मुख्य महाव्यवस्थापक (मासं)***

*D:\O&M\D.A-Adm.Circular*
*19/07/12*